" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

कोल्हापूर

## स्वप्निल कुसाळे गौरव रॅली उपक्रम

### अहवाल

बुधवार दि.21.08.2024 रोजी कोल्हापूरचा सुपुत्र मा. स्वप्निल कुसाळे यांनी पॅरिस येथे संपन्न झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत 50 मिटर रायफल शूटिंग स्पर्धेत कास्य पदक पटकावून घवघवीत यश संपादन करून देशाचा नावलौकिक वाढवला, महाराष्ट्राचा सन्मान वाढवला याबद्दल त्यांचे कौतुक करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर महानगरपालिका व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त् विद्यमाने कोल्हापूर शहरापासून त्यांच्या जन्म गावापर्यंत गौरव रॅलीचे आयोजन करण्यात आले.

संपूर्ण कोल्हापुरातील शाळा कॉलेजमधील विद्यार्थी या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. विवेकानंद कॉलेज कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व इतर अकरावी, बारावीचे असे जवळपास 450 विद्यार्थी मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. देशाच्या यशामध्ये मानाचा तुरा उंचावण्याचा या खेळाडूने स्तुत्य कामगिरी पार पाडली याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक केले जाते होते. त्याच्या या यशाचा यथोचित गौरव करण्यासाठी संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यातील लोकांनी बहुसंख्येने सहभागी होऊन त्याचा आनंद द्विगुणीत केला.

रॅलीमध्ये कला,वाणिज्य विभाग प्रमुख सौ शिल्पा भोसले, सायन्स विभाग प्रमुख प्रा.श्री एम आर नवले, एन एस एस कार्यक्रम अधिकारी श्री एल एस नाकाडी, एन.सी.सी. विभागाचे श्री जे आर. भरमगोंडा व क्रीडा विभाग प्रमुख श्री संतोष कुंडले, श्री समीर पठाण, सायन्स् स्टाफ सेक्रेटरी श्री जे.के.गुजर, आर्टस, कॉमर्स स्टाफ सेक्रेटरी श्री विश्वंभर कुलकर्णी सर तसेच ज्युनियर कला, वाणिज्य व सायन्स विभागातील शिक्षक वृंद, राष्ट्रीय सेवा योजना सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सदर गौरव रॅली यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर आर कुंभार, रजिस्टर श्री. आर. बी. जोग यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अशाप्रकारे एखाद्या सण-उत्सवाप्रमाणे गाजत वाजत या रॅलीचे आयोजन करून संपूर्ण कोल्हापूर वासियांनी आनंद वाटून घेतला.

| | |
|---|---|
| श्री. एल. एस. नाकाडी | डॉ.आर. आर. कुंभार |
| PROGRAMME OFFICER | प्राचार्य |
| N. S. S + 2 | विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. |
| VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR | (अधिकारप्रदत्त स्वायत्त) |

# स्वप्निल कुसाळे गौरव रॅली

दि. 21.8.2024







राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

